मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शनिवार, दि. 20 डिसेंबर 2025 | पान- 1


# सुसंस्कृत कार्यशैलीचा राजकीय वारसा; जनसेवेचा वसा जपणारे रवीभाऊ बाबासाहेब लांडगे

## विकसनशील प्रभाग : 06

पिंपरी | प्रतिनिधी : पिंपरी-चिंचवडच्या राजकीय पटलावर 'लांडगे' हे नाव केवळ एका कुटुंबाचे नसून ते विश्वासाचे आणि निस्वार्थ सेवेचे प्रतीक बनले आहे. कै. अंकुशराव लांडगे यांनी घालून दिलेल्या सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून, त्यांचे पुतणे रवीभाऊ लांडगे आज हा वारसा समर्थपणे पुढे नेण्याचे काम करत आहेत.



**माझा प्रभाग माझा उमेदवार!**

## वारसा समाजकारणाचा, ध्यास विकासाचा

गेल्या ४० वर्षांहून अधिक 'लांडगे' कुटुंब राजकारणाशी जोडले ले आहे. मात्र, "राजकारण केवळ निवडणुकीपुरते आणि समाजकारण कायमस्वरूपी" ही त्यांची मूळ धारणा राहिली आहे. १९७८ पासून सक्रिय असलेले हे कुटुंब १९९२ मध्ये वडिलांच्या नगरसेवक पदाच्या निवडीपासून सातत्याने जनतेच्या प्रश्नांशी भिडत राहिले आहे. आज रवीभाऊ लांडगे यांच्या रूपाने हा वारसा अधिक प्रगल्भ होताना दिसत आहे.

## राजकारण नव्हे, मित्रत्वाची नाती

रवीभाऊ लांडगे यांची सर्वात मोठी ओळख म्हणजे त्यांची 'सुसंस्कृत कार्यशैली'. सत्तेत असो वा प्रशासकीय काळात, त्यांनी कधीही अरेरावी किंवा दमदाटीच्या भाषेचा वापर केला नाही. यामुळेच अधिकारी वर्ग, मित्रपक्ष आणि अगदी विरोधकांशीही त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत.



## भविष्यातील व्हिजन: रेड झोन आणि पायाभूत विकास

आगामी काळात प्रभागातील 'रेड झोन'चा प्रश्न मार्गी लावणे आणि विकासाला नवी गती देणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. आरक्षित जागांचा योग्य वापर करून नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यावर त्यांचा भर राहणार आहे.









# सुसंस्कृत कार्यशैलीचा राजकीय वारसा;
# जनसेवेचा वसा जपणारे रवीभाऊ बाबासाहेब लांडगे



“आजवर नागरिकांनी आमच्या परिवारावर जे प्रेम केले, त्याच आशीर्वादाच्या बळावर भविष्यातही लोकप्रतिनिधी म्हणून सेवा करण्याची संधी मिळेल, अशी मला खात्री आहे.”
- रवीभाऊ लांडगे (माजी नगरसेवक)

## आरोग्य सेवा: जिथे माणुसकी जिंकली

रवीभाऊ लांडगे यांच्या कार्यशैलीचे सर्वात मोठे यश म्हणजे २०१७ मध्ये त्यांनी शासकीय रुग्णालयासाठी दिलेला लढा. खाजगीकरणाच्या विरोधात उभे राहून त्यांनी तिथे शासकीय रुग्णालय उभे केले.

जेव्हा खाजगी रुग्णालयात बेड उपलब्ध नव्हते, तेव्हा याच शासकीय रुग्णालयाने हजारो रुग्णांना जीवदान दिले. सुमारे ८ हजार रुग्णांवर विनामूल्य उपचार झाले आणि विशेष म्हणजे, एकही रुग्णाचा येथे मृत्यू झाला नाही. हेच खरे प्रभागातील नागरिकांबद्दलचे प्रेम, काळजी रवीभाऊ आणि त्यांचे कुटूंबीय जपत आहेत.

महिला आरोग्य: आजही येथील प्रसूतीगृह उत्तम सोयीसुविधांसह महिलांच्या सेवेसाठी सज्ज आहे. ज्यामध्ये गरोदर महिलांना वेळेला सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. गरोदर मातांचा प्रसुती दरम्यानचा मृत्यूदर कमी करण्यासाठी हे काम महत्त्वपूर्ण ठरले आहे.

केवळ रस्ते आणि सांडपाणी व्यवस्थापन म्हणजे विकास नव्हे, तर समाजाच्या प्रत्येक घटकाला सक्षम करणे हे रवीभाऊ लांडगे यांचे ध्येय आहे. त्यांच्या उपक्रमांची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे:

युवाशक्ती: रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून तरुणांना स्वावलंबी बनवणे.

शिक्षण व क्रीडा: विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक स्पर्धा आणि मैदानी खेळांना प्रोत्साहन. मोबाईल आणि इंटरनेटच्या जाळ्यात गुरफटलेल्या युवकांना मैदानी खेळाचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रोत्साहनपर मैदानी खेळाच्या स्पर्धा घेतल्या जातात.

महिला सक्षमीकरण: बचत गटांच्या माध्यमातून प्रभागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे. तसेच महापालिकेच्या समाजकल्याण विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ प्रभागातील माता भगिनी, विद्यार्थी, जेष्ठांपर्यंत पोहचविणे.

ज्येष्ठ नागरिकांचे वाढदिवस साजरे करून त्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण देण्याचा प्रयत्न करणे.

सुरक्षा: प्रभागात सीसीटीव्ही जाळे आणि आधुनिक पायाभूत सुविधांची निर्मिती.







